| | |
|---|---|
| **जन्म** | इ.स.चे १५ वे शतक<br>मंगळवेढा, महाराष्ट्र |
| **निर्वाण** | इ.स.चे १५ वे शतक<br>पंढरपूर, महाराष्ट्र |
| **संप्रदाय** | वारकरी संप्रदाय |
| **भाषा** | मराठी |
| **साहित्यरचना** | अभंग |
| **संबंधित तीर्थक्षेत्रे** | पंढरपूर |
| **आई** | श्यामा |

## संत कान्होपात्रा



**मंगळवेढा येथील श्री संत कान्होपात्रा मंदीर.**

महानभगवतभक्त महावैष्णव श्री ज्ञानेश्वर महाराज कालीन १२ व्या शतकात मंगळवेढेनगरीत त्यावेळी बिदरचे बहामनी राज्याचा जुल्मी सत्तेचा अंमल होता. अशाजुलमी सत्तेच्या काळात मंगळवेढ्यात कृष्ण तलावाच्या शेजारीस एक जुनाट असेमहादेवाचे मंदीर आहे. आणि त्या मंदीराशेजारी शामा नायकीण नावाची एक नर्तकीनाचगाणे करून त्यावेळच्या धनधांडग्या अमिर उमरावांना व मुसलमानी सरदारांनाखुश करीत असे. प्रसंगी स्वत:चा देह विक्री करायला सुध्दा ती मागे पूढे पाहतनसे. त्यामूळे तिची किर्ति दुरवर पसरली होती. लांब लांब चे श्रीमंत वधनवान लोक मंगळवेढ्यास येऊन शामा नायकीणच्या घरी हजेरी लावत असत. अशा याशामा नायकीणच्या पोटी सुंदर असे एक कन्यारत्न जन्मास

आले. चिखलातून तसे कमळ उगवावेत्याप्रमाणे ती कन्या चंद्रकलेसारखी दिवसेंदिवस वाढू लागली. शामाने तिचेनाव कान्होपात्रा असे ठेवले. वयात आल्यावर आपल्या मुलीनेही आपल्याप्रमाणेनाचगाणे करून बड्या श्रीमंतांची मर्जी राखावी असे शामाला वाटू लागले.कान्होपात्रा ही अती सुस्वरूप व सुंदर मुलगी होती. पण वयात आल्यानंतरनायकिणीचा धंदा न करता तिने पांडुरगाच्या भक्तीत वाहून घेतले. वती पंढरपूरास वारक-यासोबत वारीला जात असे. त्यामुळे

तिला संत श्रेष्ठज्ञानेश्वर माऊलीची भेट होऊन सहवास लाभला. संत संगतीमुळे तिच्या जीवनातअमुलाग्र बदल झाला व ती नेहमी हरीनाम दंग होत असे व किर्तन ही करत असे.तीचे अनेक अभंगही प्रसिध्द आहेत.



**श्री संत कान्होपात्रा मुर्ती**

योगिया माजी मुगुट मणी । त्रिंबक पाहावा नयनी ॥
माझी पुरवावी वासना । तू तो उध्दाराच राणा ॥
करुनिया गंगा स्नान । घ्यावे ब्रह्मगिरीचे दर्शन ॥
कान्होपात्रा म्हणे पंढरीराव । विठ्ठल चरणी मागे ठाव ॥

तिच्यादेखणेपणाची ख्याती बिदरचे बादशहाला समजताच त्याने तिला पकडून आणण्यासाठीआपल्या सरदारास मंगळवेढ्यास पाठवले. आपले शील भ्रष्ट होऊ नये म्हणून तीपंढरपूरी गेली व विठ्ठल मंदीरात जाऊन परमेश्वराचा धावा करु लागली. बादशहाचे सरदार तिला पकडण्यासाठी मंदिरात गेले. त्यावेळी कान्होपात्रेने भक्तवत्सलपांडूरंगाच्या पायास कडकडून मिटी मारली व आर्तवाणीने पांडुरंगाचा धावा केला

नको देव राया अंत असा पाहू । प्राण हा सर्वता जावू पाहे ॥
हरीणीचे पाडस । व्याघ्रे धरीयले । मजलागी झाले तैसे देवा ॥
मोकलून आस । जाहले उदास । घेई कान्होपात्रेस ह्रद्‌यात ॥

बादशहाच्यासरदाराने तिचा पंढरपूरी पाठलाग केला. तेंव्हा तिने अत्यंत करूण वाणीनेधावा करून आपला देह पांडुरंगाच्या चरणी समर्पण केला. परमेश्वर प्रसन्नझाले. तिचा जीवआत्मा तिचे कुडीतून परमेश्वर स्वरूप झाला व तिचा देह तेथेचमृतवत होऊन पडला. तिला मंदिराच्या दक्षिण

दरवाज्याजवळ पूरण्यात आले आहे.तेथे एक तरटी वृक्ष उगवला असून तो अक्षय हिरवा आहे. शालिवाहन १२ व्या शतकातघडलेली ही सत्य घटना कान्होपात्रेच्या तरटी वृक्षाच्या रुपाने आजहीजसाच्या तशी पांडुरंगाच्या मंदिरात काळ्या दगडावर उभी आहे.

# कान्होपात्रा

विठ्ठलभक्तीचा लखलखीत आविष्कार घडवणाऱ्या कान्होपात्रेविषयी फार कमीमाहिती उपलब्ध आहे. त्यांनी बरीच अभंगरचना केली असावी, पण ते लिहून ठेवणारं कुणी नव्हतं. त्यामुळे त्यांचं खूप थोडं काव्य उपलब्ध आहे. पण त्यांचं जे भक्तीरसपूर्ण अभंग उपलब्ध आहेत त्यातल्या विठ्ठलभक्तीच्या आविष्काराने आपण दिपून जातो.

इतर विठ्ठलभक्त स्त्रियांहून कान्होपात्रेचं जीवन पूर्णत: भिन्न होतं. शामा नावाच्या अतिशय धनवान, रूपसंपन्न गणिकेच्या पोटी तिचा जन्म झाला. ऐषोआरामी आणि सुखोपभोगी वातावरणात ती वाढली. त्या घरात विठ्ठलभक्तीची परंपरा असणं शक्यच नव्हतं. वेश्याकुळातल्या स्त्रीला गुरू तरी कुठला लाभणार? पण गणिकेच्या रूढ अशाभोगविलासी मार्गाकडे न जाता ती परमार्थ मार्गाकडे वळली आणि उत्कट भक्तीनेपरमेश्वरस्वरूप पावली.
पंढरपूरपासून सात कोसांवर मंगळवेढे गावातराहणाऱ्या धनाढ्य शामा नायकिणीची कान्होपात्रा ही मुलगी. वडील अर्थात कोणते माहीत नव्हतं. पण शामाचा असा अंदाज होता की गावचा नगराध्यक्ष सदाशिवमालगुजर तिचा पिता असावा. लहाणपणीच तिच्या पायात बांधलेले गेलेले चाळकोडकौतुकाचे नव्हते तर वेश्यावृत्तीला अपरिहार्य असं नृत्य शिकण्यासाठी होते. रूप आणि तारुण्याच्या जोरावर लोकांकडून पैसे वसूल करावेत असं वातावरण अवतीभोवती होतं. आईचा आग्रह तसाच होता. पण भक्तीचा अंकूर तिच्या ह्रदयात फुटला होता.

मंगळवेढ्याचा नगराध्यक्ष सदाशिव मालगुजर याची नजर कान्होपात्रेवरपडली. त्याने कान्होपात्रेचं नाचगाणं बघण्याची इच्छा व्यक्त केली. शामानेकाहीतरी सांगून कान्होपात्रेला कसंबसं सदाशिवसमोर आणलं. त्याची विषारी नजरतिच्यावर पडली. याच्यासारख्या नीच माणसाच्या इच्छेखातर आपण गायन-नृत्यकरणार नाही असं तिने त्याच्या तोंडावर सांगितलं. भडकलेल्या नगराध्यक्षानेसूडसत्र सुरू केलं. ती त्याची मुलगी असल्याचं शामाने सांगून पाहिलं. पण तोइतका वासनांध झाला होता की हे खोटं असल्याचं त्याने म्हटलं. शामा आणिकान्होपात्रेचा छळ सुरू झाला. वैभव ओसरलं. त्याच्याविरूद्ध न्याय कोणदेणार? अखेर शामाने त्याची माफी मागितली. त्याने तीन दिवसांतकान्होपात्रेला आपल्यासमोर आणून उभं करण्याचा हुकुम दिला. या संकटानेकान्होपात्रा डगमगली नाही. ती देवासमोर हात जोडून जप करू लागली. रात्रभर तीजप करतच होती. पहाटे डोळा लागला आणि भजन-टाळांचा गजर ऐकून कान्होपात्रेलाजाग आली.

वारकऱ्यांचा एक जत्था आषाढीनिमित्त भजन गात पंढरपूरासचालला होता. त्याक्षणी मनातला

अस्पष्ट विचार तिने पक्का केला. तिचीम्हातारी दासी हौसा वारकरी होती. बळजबरी अत्याचारातून सुटण्याची संधी जणूदेवाने तिला दिली होती. हौसाच्या संगनमताने तिने फाटके विटके कपडे घातलेआणि ती पंढरपूरला निघाली. तिच्या मनाला विठ्ठलाची ओढ लागली. मध्यरात्रीच्याअंधारात एका दासीच्या वेषात तिने मंगळवेढे सोडलं. यापुढे रूपवती तरुणकान्होपात्रेने निर्भयतेने पूर्णपणे विठ्ठलावर विसंबून आपला जीवनक्रमठरवला. पंढरपूरला आल्यावर तिने पांडुरंगाचं दर्शन घेतलं आणि त्यावेळी तीसंपूर्णपणे त्याच्या चरणाशी एकाग्र झाली.

व्याकूळ भावाने ती विठ्ठलाची विनवणी करू लागली -

मज अधिकार नाही । भेटी देई विठाबाई ।।

ठाव देई चरणापाशी । तुझी कान्होपात्रा दासी ।।

आपलंसगळं अस्तित्व विठोबाच्या पायी समपिर्त करून तिने त्याचं दास्यत्वपत्करलं. कान्होपात्रा स्वरचित अभंग गाऊ लागली आणि तिचा स्वगीर्य आवाज ऐकूनहजारो वारकरी तल्लीन झाले. तिथे येणारे सारे विठ्ठलावरच्या प्रेमामुळेचयेत होते. त्या अभंगातला भाव त्यांच्या हृदयाला भिडला. वृद्ध हौसाबाईनेकान्होपात्रेसाठी आणि स्वत:साठी एक झोपडी बांधली. कान्होपात्रा दिवसातूनदोनदा विठ्ठलाचे देऊळ झाडून पुसून लख्ख करत असे. पहाटे आणि रात्री तीदेवासमोर नृत्य आणि भजन करी. लोकांना वाटे ती देवाचं वेड घेतलेली, गरीबशेतकऱ्याची पोर आहे. कान्होपात्रा दिवसेंदिवस विठ्ठलभक्तीत खोल बुडत गेली.लोक तिचा आदर करू लागले. भोगविलासाची इच्छा तिला नव्हतीच. मुळचा ओढाचपरमार्थाकडे असल्याने तिच्या ध्यानी मनी विठ्ठल राहू लागला. मन त्याच्याचरणी एकाग्र होऊ लागले. त्याची भेट व्हावी म्हणून तळमळ होऊ लागली.

जिवाचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई

सावळे डोळसे करूणा येथु देई काही

अशी आर्त विनवणी उमटू लागली. कालांतराने,

सर्व सुखाचे जे निजसुखाचे सारगे माय

तो हा पंढरीराय विटेवरी

असा समाधानाचा, शांतीचा भाव मनी उपजला. विठ्ठलाचे चरण हे आत्मसुखासमानअसल्याने सर्व इच्छा, वासना निमाल्या. इकडे नगरप्रमुखावर खवळलेल्या लोकांनीत्याच्या घराला आग लावली.

पण तो निसटून बादशहाकडे गेला. बादशहाच्यासाहाय्याने त्याने लोकांवर सूड उगवला. त्यांच्या घरादारांवर नांगर फिरवला.त्यांना पकडून तुरुंगात टाकून हाल केले आणि सर्वत्र वचक बसवला. नंतर त्यानेकान्होपात्रेचा पत्ता मिळवला आणि तिच्या लावण्याचं वर्णन करून तिलाजनानखान्यात दाखल करण्याविषयी बादशहाला उद्‌युक्त केलं. बादशहानेपंढरपूरच्या पुजाऱ्यावर फर्मान बजावलं की त्याने कान्होपात्रेला स्वाधीनकरावं. नाहीतर मंदिर जमीनदोस्त करण्यात येईल. विठ्ठलमंदिराला सैनिकांचागराडा पडला. आपल्यासाठी लाखोंचं भक्तिस्थान असलेलं सारसर्वस्व विठ्ठलाचंराऊळ उद्‌ध्वस्त व्हावं हे तिला सहन होणं शक्यच नव्हतं. कान्होपात्रासेनाधिकाऱ्यासमोर हजर झाली. तिने एकवार विठ्ठलाचं दर्शन घेण्याची परवानगीमागितली.

कान्होपात्रा तडक देवासमोर हात जोडून उभी राहिली. देवापासून दूर जाण्याची कल्पना तिच्यासाठी असह्य होती. ती देवाला म्हणाली,

नको देवराया अंत आता पाहू ।

प्राण हा सर्वस्व फुटो पाहे ।।

हरिणीचे पाड व्याघ्रे धरियले

। मजलागी जाहले तैसे देवा ।।

तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनी

। धावे वो जननी विठाबाई ।।

मोकलूनी आस, झाले मी उदास ।

घेई कान्होपात्रेस हृदयास ।।

परमेश्वराचीआर्त व्याकूळ विनवणी करत असलेला तिचा आवाज सर्वत्र भरून राहिला. आपल्याउत्कट भक्तीने चराचर चैतन्याशी ती जोडली गेली आणि अखेर त्या चैतन्याशीएकरूप झाली. आपल्या विठ्ठलाच्या पायाशी तिने देह ठेवला. एक आख्यायिका अशीआहे की, त्यावेळी चंदभागेला प्रचंड महापूर आला. सारं यवन सैन्य वाहून गेलं.विठ्ठल मंदिरही जलमय झालं. चंदभागेतल्या एका खडकाळ जागी आधी तिचं शरीरअडकलं. मग ते महासागराच्या खोल तळाकडे चंदभागेने वाहून नेलं. दुसऱ्या दिवशीपूर ओसरल्यावर तिचा मृतदेह ज्या खडकाळ जागी काही काळ पडला होता तिथे एकतरटी वृक्षाचं रोप उगवल्याचं आढळलं. तो अक्षय तरटी वृक्ष

आजहीकान्होपात्रेच्या विठ्ठलभक्तीची ग्वाही देत तिथे उभा आहे.

कान्होपात्रेनेस्वत:ला देवाची वधू म्हणवलं तरी तिचा विठ्ठल तिच्यासाठी आई होता. सखाहोता. माय, बाप, बंधू, भगिनी होता. देहाच्या उपाधी सुटाव्या म्हणून देवाकडेप्रार्थना करते. कान्होपात्रेला काय हवं होतं? 'देगा प्रेमकळा-नाम तुझे' विठ्ठल तिच्यासाठी कनवाळू, मायमाऊली होता. दासाची कळकळ वागवणारा दीनांचानाथ, कृपावंत मालक होता. भक्तांचा दास होता. ज्याच्या प्राप्तीसाठी चारीवेद सहाही शस्त्रं शिणली तो केवळ भक्तीने प्राप्त होतो. 'अगा वैकुंठीच्याराया, अगा विठ्ठल सखया' अशी आर्त हाक ती त्याला आपल्या संरक्षणासाठी मारतहोती.

कान्होपात्रेच्या अपूर्व भक्तीने अखेर तिला सर्वातून मुक्तीमिळाली. विठ्ठलाचे पाय न सोडता त्याच्या चरणी सहज देहत्याग घडावा हेपराकोटीच्या भक्तीखेरीज अशक्य होतं. कुणी गुरू नाही. काही परंपरा नाही.भक्तीचं वातावरण नाही. अशा परिस्थितीत केवळ आपल्या भक्तीने तिनेईश्वरप्राप्ती करून घेतली. म्हणून कान्होपात्रा अद्वितीय ठरते. तिच्याभक्तीमुळे समाजही तिच्या पायाशी नतमस्तक झाला आणि तिला संतपद मिळालं.